अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपिल क्र. PUMCO/A/2019/60057 (१४/२०१९)
जा.क्र उआ (सा.प्र.)/ २८७९ दि. १८/०७/२०१९

## अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/ PUMCO/A/2019/60057 (१४/२०१९)

**श्रीमती पोर्णिमा सचिन साठे**
**१०४ डी ३७ सेक्टर,** ९ शांतीनगर,
**ठाणे पिन** ४०११०७

------------------ अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी
तथा प्रशासन अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका

### माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

**श्रीमती पोर्णिमा सचिन साठे** रा. १०४ डी ३७ सेक्टर, ९ शांतीनगर, ठाणे पिन ४०११०७ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. ३०.०५.२०१९ रोजी ऑनलाईन अर्ज करून “Please make available the information about the vacant posts for the post STAFF NURSE in hospitales running under the municipal corporation in all catagories with grad pay band 4200 ” बाबत माहिती मागितलेली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/२०१० दि. १९.०६.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ३०.०५.२०१९ | ३०.०५.२०१९ | २९.०६.२०१९ | १९.०६.२०१९ | - |

अपिलार्थी यांनी "No Response Within the time Limit." असे नमूद करून अपील क्र. PUMCO/A/2019/60057 (१४/२०१९) चा अपील अर्ज दि. ०३.०७.२०१९ रोजी दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ०३.०७.२०१९ | ०३.०७.२०१९ | १८.०७.२०१९ | होय | - |

सदर प्रकरणी दि. १७.०७.२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्रीमती पोर्णिमा सचिन साठे रा. १०४ डी ३७ सेक्टर, ९ शांतीनगर, ठाणे पिन ४०११०७ हे उपस्थित होते. श्री चेतन कबाडे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा हे उपस्थित होते.

विवेचन

श्री चेतन कबाडे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/२०१० दि. १९.०६.२०१९ अन्वये अर्जास ऑनलाईन उत्तर दिलेले आहे असे प्रतिपादन केले. तर अपिलार्थी श्रीमती पोर्णिमा सचिन साठे रा. १०४ डी ३७ सेक्टर, ९ शांतीनगर, ठाणे पिन ४०११०७ यांनी माहिती मिळाली नाही व ऑनलाईन पाठविलेले उत्तर मला पोहोचले नाही असे प्रतिपादन केले त्यावर अपील अॅथोरिटी यांनी जन माहिती अधिकारी यांना पाठविलेले उत्तर ऑनलाईन दाखविण्यास सांगितले ते पाहून खात्री करून अपिलार्थी यांनी ऑनलाईन उत्तर दिले असल्याचे अपील अॅथोरिटी यांचे समोर मान्य केले.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना ऑनलाईन उत्तर दिलेले आहे. सबब अपील क्र. PUMCO/A/2019/60057 (१४/२०१९) निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका